# पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्र. २१८/१९९७**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठाकडे ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेत गैरप्रकार केल्याबद्दल तक्रारी आलेल्या आहेत त्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत कार्यवाही करण्याकरिता विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने नेमलेल्या संबंधित समितीपुढे तक्रारी ठेवण्यात येतील. गैरप्रकार प्रकरणातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाचा निर्णय कळविण्यास काही कालावधी लागतो. दरम्यानच्या काळात विद्यापीठाच्या पुढील परीक्षांचे अर्ज भरण्याची तारीख विद्यापीठामार्फत जाहीर करण्यात येते, तसेच महाविद्यालये प्रवेश देण्याची प्रक्रियाही सुरू करण्याच्या तारखा जाहीर करतात. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळातील घडलेल्या गैरप्रकाराच्या प्रकरणांबाबत निर्णय कळविला नसेल अशांना त्यांच्या स्वतःच्या जबाबदारीवर परीक्षा अर्ज भरता येईल. तसेच महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश घेता येईल. या संदर्भात खालील नियमांची अंमलबजावणी करण्यात येईल :

१. ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत गैरप्रकार केला आहे व ज्यांची प्रकरणे विद्यापीठात आलेली आहेत, अशा विद्यार्थ्यांना पुढील सत्रासाठी अगर वर्षासाठी प्रवेश घ्यावयाचा असेल तर संबंधित विद्यार्थी प्राचार्यांना तसा अर्ज सादर करतील.

२. ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परीक्षांसाठी अर्ज करावयाचा आहे, असे विद्यार्थी मा. प्राचार्यांना/संचालकांना/विभागप्रमुखांना तशी लेखी विनंती करतील आणि विद्यापीठ त्याचे गैरप्रकाराचे प्रकरणावर जो निर्णय घेईल तो निर्णय संबंधित विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील आणि त्याबाबत विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार राहणार नाही, असे हमीपत्र ते भरून देतील.

३. अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश (Provisional) दिला जाईल, तसेच अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज तात्पुरत्या स्वरूपात (Provisional) स्वीकारले जातील.

४. गैरप्रकार प्रकरणात विद्यार्थी निर्दोष आढळून आल्यास त्याचा महाविद्यालयातील प्रवेश तसेच विद्यापीठ परीक्षा अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.

५. विद्यार्थी जर परीक्षा गैरप्रकरणात दोषी आढळला तर त्याला विद्यापीठाने दिलेल्या शिक्षेच्या प्रकारानुसार त्याचा महाविद्यालयातील प्रवेश, तसेच विद्यापीठ परीक्षा अर्ज आपोआप रद्द समजला जाईल. यासाठी भरलेली फी परत केली जाणार नाही.

६. गैरप्रकरणात सापडलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या जबाबदारीवरच महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे. तसेच परीक्षा अर्ज भरावयाचा आहे.

७. गैरप्रकरणात सापडलेल्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरताना पुन्हा त्या परीक्षेसाठी सर्व विषयांचा अर्ज भरावा. परीक्षेच्या काळापर्यंत विद्यापीठाचा निर्णय त्यांना न कळविल्यास संपूर्ण विषयांची परीक्षा त्यांनी पुन्हा द्यावी. मात्र विद्यापीठातर्फे त्यांच्या प्रकरणांबाबत जो निर्णय दिला जाईल त्यानुसार त्यांच्याबाबत पुढील कार्यवाही केली जाईल.

गणेशखिंड, पुणे-७
जा. क्र. : परीक्षा/कक्ष-५/१३७५
दिनांक : ९ जून, १९९७

सही...
मा. परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीसाठी :

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्था.
२. मा. विभागप्रमुख, पदव्युत्तर विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.
३. केंद्र अधिकारी, अहमदनगर व नाशिक जिल्हा उपकेंद्र.
४. सहाय्यक कुलसचिव, परीक्षा विभाग (कक्ष १ ते ५).
५. कक्षाधिकारी, परीक्षा विभाग (कक्ष १ ते ५).

पु.वि.मु. १,०००-३-२००८ (२७३९/एक्झाम) (पीसी-२)